# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Washim Dist.**

**Date of Good Work done** :- **12/08/2022**

**Brief of the work done :-**

महिलांची छेड काढणाऱ्यांना तुरुंगवारी अटळ ; महिलांच्या सुरक्षिततेकरिता जिल्हाभरात 13 निर्भया पथकांची स्थापना.



लोकमत

## छेड काढाल, तर जेलची हवा खाल!

**वाशिम:** तरुणी व महिलांची छेड काढणाऱ्यांविरोधात जिल्हा पोलिसांनी कठोर मोहीम सुरू केलेली आहे. यासाठी शहरात निर्भया पथकासह जिल्हाभरात १३ पथकांची स्थापना करण्यात आली असून, जानेवारी ते जूनदरम्यान सहा महिन्यांत छेडछाडीच्या प्रकरणात ८८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्वच प्रकरणात पोलिसांनी कलम ३५४ अंतर्गत आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत इन्फोग्राफिक्स

### सहा महिन्यांत ८८ तक्रारी

जिल्ह्यात जानेवारी ते जून २०२२ दरम्यान महिला, मुलींच्या छेडछाडीप्रकरणी ८८ तक्रारी दाखल करण्यात आल्या आहेत. यात सर्वाधिक २२ तक्रारी मार्च महिन्यात, तर सर्वात कमी १० तक्रारी जून महिन्यात दाखल झाल्या आहेत.

### सर्वच आरोपींवर गुन्हा

महिला, मुलींची छेड काढल्याप्रकरणी गत सहा महिन्यात दाखल करण्यात आलेल्या ८८ प्रकरणात सर्वच आरोपींवर गुन्हा दाखल झाला असल्याची माहिती संबंधित पोलीस अधिकाऱ्यांकडून प्राप्त झाली आहे.

### छेड काढाल तर खाल जेलची हवा

कोणतीही मुलगी किंवा स्त्रीला भारतीय दंड संहिता कलम 354 नुसार विनयभंगाचा गुन्हा दाखल करता येतो. विनयभंगाचा कायदा हा सार्वजनिक जीवनातील नैतिक आचरण व सभ्य वर्तनाशी संबंधित आहे.

### छेडछाडीला रोखण्यासाठी १३ पथके

छेडछाडीला रोखण्यासाठी जिल्ह्यात १३ पथके स्थापन करण्यात आली असून, या १३ पथकात ८ अधिकारी आणि ७२ अमलदारांचा समावेश आहे. ही पथके महिला आणि मुलींची छेड काढणाऱ्यांच्या मुसक्या आवळण्याचे काम चोखपणे पार पाडत आहेत. त्यामुळे रस्त्यावरील छेडछाडीच्या प्रकरणांना मोठा आळा बसला आहे. जिल्ह्यातील सहाही तालुक्यात या पथकांनी चांगलाच दरारा निर्माण केल्याचे दिसून येत आहे.

### तक्रारकर्त्यांचे नाव गोपनीय ठेवतात

- महिलांच्या छेडखानीप्रकरणी तक्रार करण्यास स्वत: महिला आणि इतरही लोक पुढाकार घेण्यास घाबरतात ही बाब चुकीची आहे.
- प्रत्यक्षात या प्रकरणांना आवर घालण्यासाठी तक्रारकर्ते समोर यावेत म्हणून त्यांचे पोलिसांकडून नाव गुप्त ठेवले जाते.

महिला व तरुणींच्या छेडछाडीच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाभरात १३ पथके स्थापन करण्यात आली आहेत. ही पथके आपली जबाबदारी चोखपणे पार पाडत असल्याने छेड काढणाऱ्यांच्या मुसक्या वेळीच आवरणे शक्य होऊन घटनांवर नियंत्रण मिळत आहे.

- बच्चन सिंग,
पोलीस अधीक्षक, वाशिम